पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/३/कावि/६७३/२०१८
दिनांक - ११/०५/२०१८

प्रति,

मा.........................................,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा दिनांक - १६/०५/२०१८ रोजी आयोजित केले बाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक **१६/०५/२०१८** रोजी दुपारी **०२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – ६३**

**दिनांक - १६/०५/२०१८** **वेळ – दुपारी ०२.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक **१६/०५/२०१८** रोजी दुपारी **०२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

दिनांक ०९/०५/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ६२) चा सभावृत्तांत कायम करणे.

----------

विषय क्र.१) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.90/1/2017-18 अन्वये प्रभाग क्र.३९ संत तुकारामनगर मधील वाय सी एम हॉस्पिटल मधील आय.सी.यु. व ओटी रिनोव्हेशनची उर्वरित कामे करणेकामी मे.ए.आर.नायडू नि.र.रू.1,17,77,323/- (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी सतरा लाख सत्याहत्तर हजार तीनशे तेवीस फक्त) पेक्षा 12.65% कमी दराने प्राप्त झालेली आहे. सन २०१७-१८ चे एस.एस.आर. दरानुसार प्राप्त निविदा स्विकृत योग्य दरापेक्षा 21.46% कमी येत असल्याने प्राप्त निविदा मंजूर दराने र.रू.1,02,87,492/- पर्यंत काम करून घेणेस आणि त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक १६/०५/२०१८ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.२) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.95/2/2017-18 अन्वये विकास प्राधिकरण हद्दीतील पेठ क्र.३२ येथे वायू प्रदूषण नियंत्रण यंत्रणेसह गॅसवर आधारित आधुनिक शवदाहिनी सह स्मशानभुमी विकसीत करणेकामी मे. बी. के. खोसे नि.र.रू.4,62,00,483/- (अक्षरी रक्कम रुपये चार कोटी बासष्ठ लाख चारशे त्र्याऐंशी फक्त) पेक्षा 3.75% जादा दराने प्राप्त झालेली आहे. सन २०१७-१८ चे एस.एस.आर. दरानुसार प्राप्त निविदा स्विकृत योग्य दरापेक्षा 7.66% ने कमी येत असल्याने प्राप्त निविदा मंजूर दराने र.रू.4,79,33,001/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३) मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील प्रस्तावासोबतच्या प्रपत्र अ (१ ते ०६) मधील कामाचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे भाववाढ कलम लागू असल्यास, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा / वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहून संबंधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.४) महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.०९/०४/२०१८ ते दि.१५/०४/२०१८ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/८९/२०१८ दि.०३/०५/२०१८ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणे.

विषय क्र.५) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये NIC यांचेकडील ई-निविदा (e-Procurement) संगणक प्रणालीची यशस्वीपणे अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने NIC, NICSI यांचेकडील एकूण ३ Support Staff सहा महिन्यांकरीता नियुक्त करणेकरीता येणारा खर्च र.रू.६,१०,८२६/- (अक्षरी र.रू.सहा लाख दहा हजार आठशे सव्वीस फक्त) अथवा येणारा प्रत्यक्ष खर्च NIC, NICSI यांना आगाऊ स्वरूपात अदा करणेस तसेच सदरचा Support Staff हा NIC, NICSI यांचेमार्फत करारनामा न करता थेट पध्दतीने उपलब्ध करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.६) मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.नो.क्र.३१/२/२०१७-१८ अन्वये सन २०१७-१८ करिता प्रभाग क्र.४४ आणि ४५ मध्ये जुन्या पाईपलाईन बदलून नवीन पाईपलाईन टाकणेकामी मे.डी.एम.एंटरप्रायझेस निविदा रक्कम रू.३०,८१,२०४/- (अक्षरी र.रू. तीस लाख एक्याऐंशी हजर दोनशे चार फक्त) पेक्षा २०.२२% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.२४,५८,१८४/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.७) महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.०२/०४/२०१८ ते दि.०८/०४/२०१८ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/८८/२०१८ दि.०३/०५/२०१८ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणे.

विषय क्र.८) मा.सह व्यवस्थापकीय संचालक यांचे कडील पत्र क्रं. पी.एम.पी.एम.एल.मुलेविअ/ ५०१ दि.०४/०५/२०१८ अन्वये सन २०१८-१९ ची अंदाजीत संचलनतूट र.रू.२०३.९० कोटी गृहीत धरून ४०% नुसार पिंपरी चिंचवड मनपाचा संचलन तूटीचा हिस्सा ८१.५६ कोटी व विविध प्रकारचे पासेसच्या अनुदाना पोटी सन २०१८-१९ साठी मागणी र.रू.२३.५० कोटी राहील असे नमूद केले असून माहे मे २०१८ पर्यंत अनुक्रमे प्रतिमहा र.रू.६.८० कोटी दरमहा संचलनतूट अग्रीम स्वरूपात द्यावी तसेच दरमहा सवलतीचे पासेस पोटी र.रु.१.९६ कोटी असे एकूण र.रु.८.७६ कोटी, अग्रीम स्वरुपात द्यावी अशी विनंती केली आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सन २०१८-१९ चे अंदाजपत्रकात पीएमपीएमएल निधी या लेखाशिर्षावर र.रु.१६४.५६ कोटी (अक्षरी र.रु.एकशे चौसष्ट कोटी छपन्न लाख) फक्त तरतूद करणेत आली असून यामध्ये संचलनतूट ८१.५६ कोटी विविध प्रकारचे पासेस र.रु.२३ कोटी व बसेस खरेदी र.रु.६० कोटी असा अपक्षीत खर्च गृहीत धरण्यात आलेला आहे. सदर रकमेतून मे २०१८ ची रक्कम रुपये ६ कोटी संचलनतूट व सवलतीचे पासेसपोटी र.रु.१.५० कोटी असे एकूण र.रु.७.५० कोटी (अक्षरी र.रु. सात कोटी पन्नास लाख) फक्त याप्रमाणे माहे मे २०१८ अखेर ०१ महिन्याची अग्रीम स्वरुपात अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.९) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रस्त्यांमधून भुमिगत सेवावाहिन्या टाकण्यासाठी मनपाकडे विविध शासकीय/निमशासकीय तसेच खाजगी संस्थेंकडून रस्ता खोदाई परवानगीसाठी प्रकरणे वेळोवेळी सादर होत असतात. सदर सेवावाहित्या नगरिकांच्या सोयीसाठी आवश्यक असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २३९ अन्वये सदर संस्थांना त्यांचेकडील भुमिगत सेवावाहिन्या टाकण्यासाठी रस्ता खोदाई परवानगी महापालिकेमार्फत देण्यात येते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २४१(२) अन्वये संबंधित कंपनीकडून सदर खोदलेला रस्ता दुरुस्त करण्यासाठी जो खर्च येईल तो वसूल करावयाचा आहे. त्यासाठी सदर खोदलेले रस्ते दुरुस्तीसाठी मनपाने दर निश्चित केले असून सदर दर वेळोवेळी सुधारित करण्यात येतात. मनपाच्या सदर प्रचलित दरानुसार रस्ता दुरूस्तीपोटी येणारा खर्च संबंधित कंपनीकडून आगाऊ भरुन घेण्यात येतो. सद्य:स्थितीत सदर रस्ते दुरुस्ती शुल्कामध्ये रस्ता दुरुस्ती खर्च अंदाजे सरासरी र.रु.६,५००/- व मनपा अधिभार सरासरी र.रु.३,०००/- असे प्रती मी. प्रमाणे आकारण्यात येतो. त्यानुसार अद्याप पर्यंत सर्व खाजगी, शासकीय/निमशासकीय संस्थांना (महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादित वगळून) त्यांच्या सेवावाहिन्या टाकण्यासाठी वरीलप्रमाणे शुल्क आकारुन रस्ता खोदण्यासाठी परवानगी देण्यात येत आहे. खोदलेल्या रस्त्यामुळे वाहतुकीस होणारा अडथळा व त्यामुळे होणारे अपघात टाळण्याच्या दृटीकोनातून तसेच नागरिकांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी मनपास रितसर निविदा प्रक्रिया करुन, सदर खोदलेल्या रस्त्यांची

दुरुस्ती तातडीने करावी लागते.

**<u>महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांची मागणी-</u>**

कार्यकारी अभियंता, मऔविम यांचे कडील पत्र क्र.उ.अ./स्था/IFMSA0664/2018 दि.४/१/२०१८ पत्राचे अवलोकन होणेस विनंती. सदर पत्रामध्ये कार्यकारी अभियंता, मऔविम यांनी पिं.चिं. औद्योगिक क्षेत्रातील जुन्या जलवाहिन्या बदलण्या संदर्भात परवानगी विषयी दि.२०/१२/२०१७ च्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये निर्णय घेणेकामी विनंती केली होती. तरी अद्यापपावेतो पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे या सर्व साधारण सभेमध्ये काय निर्णय झाला ते अद्याप कळविण्यात आलेले नाही. तरी आपण आपल्या स्तरावर योग्य तो निर्णय घेऊन परवानगी संदर्भात कार्यवाही त्वरीत करावी, जेणे करुन सदरील काम लवकरात लवकर सुरु करता येईल व उद्योजकांतर्फे येणा-या पाण्याच्या तक्रारी दूर करता येतील, असे कळविलेले आहे.

त्यानुषंगाने, इकडील पत्र क्र.स्था/श.अ./तां/४/३२/२०१८ दि.३१/१/२०१८ अन्वये कार्यकारी अभियंता, मऔविम यांना अद्यापपावेतो महानगरपालिकेच्या मा.महापालिका सभेमध्ये पिंपरी चिंचवड औद्योगिक क्षेत्रातील जुन्या जलवाहिन्या बदलण्या संदर्भात परवानगीबाबत निर्णय घेण्याबाबतची कार्यवाही करण्यात आलेली नाही. सबब सद्य:स्थितीत मनपाच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे खोदाईची परवानगी घेऊन कार्यवाही करण्यात येणे बाबत कळविलेले आहे.

उप अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचेकडील पत्र क्र.उ.अ./ IFMNS/A56045/2018 दि.१२/२/२०१८ चे अवलोकन होणेस विनंती. सदर पत्रान्वये उप अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी “मऔविम क्षेत्रामधील व पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील काही जुन्या जलवाहिन्या बदलण्याचे काम चालू करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकाकडे रस्ते खोद काम करणेसाठी परवानगी मागितलेली आहे. सदर रस्ते मऔवि महामंडळाचे मालकीचे असून रस्ते दुरुस्ती व देखभखालीसाठी पिंपरी चिंचवड नवनगरपालिकेस हस्तांतरीत करणेत आलेले आहेत. तरी मऔविम क्षेत्रामधील जुन्या जलवाहिन्या बदलण्यासाठी रस्ते खोदकाम शुल्क परिगणित करताना मनपा अधिभार लावू नये”, असे कळविलेले आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रस्त्यात बाह्य संस्थेंच्या भूमिगत सेवावाहिन्या टाकणेसाठी रस्ता खोदाईस परवानगी देणेसाठी रस्ता पुर्ववत करणेच्या शुल्क व मनपा अधिभार आकारण्या बाबतचे धोरण दि. ९/५/२००७ च्या मान्य प्रस्तान्वये निश्चित

केलेले आहे. सदरचे धोरण निश्चित करताना “पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये महापालिका रस्ते बांधणे व वेळोवेळी रस्ते सुस्थितीत ठेवणेकामी मोठ्या प्रमाणावर भांडवली खर्च करते. अशा रस्त्यावर ब-याचवेळी व्यावसायीक हेतुनं केबल लाईन्स/टेलीफोन लाईन्स/ इलेक्ट्रीक लाईन्स व अन्य सेवा वाहिन्या टाकणेसाठी रस्ता खोदाईस परवानगी संबंधित संस्था/कंपनी महापालिकेकडे मागतात. सदर रस्त्यावर केबल/लाईन्स टाकल्यावर सदर संस्था/कंपनी यांना त्यातुन मोठ्या प्रमाणावर महसूल मिळतो. सदर संस्था/कंपनी मनपाच्या रस्त्यावर सदर व्यावसायिक व्यवहार करताना नफा कमवितात व मनपा मात्र रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर भांडवली खर्च करते. सदर भांडवली खर्च काही प्रमाणात वसूल व्हावा याकरिता अशा संस्था/कंपनी यांना रस्ता खोदाईस परवानगी देताना मनपा अधिभार लावण्यात यावा. व हा अधिभार खोदाईसह रस्ते पुर्ववत करण्याचे मनपाचे विहीत दरा खेरीज अलाहिदा असावा.”असे सदरच्या प्रस्तावात नमुद आहे.

त्यानुसार, महापालिका क्षेत्रातील रस्त्यात महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी वगळून सर्व बाह्य संस्थेंकडून रस्ता पुर्ववत करण्याचे शुल्क व मनपा अधिभार आकारून रस्ता खोदाईस परवानगी देण्यात येत होती.

तथापि- १) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचेकडून तत्कालीन मा. पालकमंत्री व ऊर्जा मंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे बैठकीतील सुचनेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पुणे महानगरपालिका यांनी र.रू.१५००/- व तदनंतर र.रू.२३००/- प्रती मी. याप्रमाणे एकत्रित शुल्क आकारून रस्ता खोदाईस परवानगी देणेचे धोरण निश्चित केले होते. महाराष्ट्र शासनाचे नगर विकास विभागाने पत्र क्र .संकीर्ण-२९१५/प्र.क्र.३७८/नवि-२० दि .१८ मार्च २०१६ अन्वये कळविले नुसार “महानगरपालिका , नगरपालिका क्षेत्रात भुमिगत विज वाहीनी टाकण्यासाठी नागपुर महानगरपालिका आणि महावितरण यांचेत Road reinstatement बाबत झालेला सामंजस्य करारनामा नमुना समजून त्यानुसार सामंजस्य करारानुसार कार्यवाही करुन अनुपालन अहवाल शासनास सादर करणेबाबत”कळविले आहे. त्यानुसार, दि.२२/१२/२०१७ च्या मा.आयुक्त यांचा मान्य प्रस्ताव, मा. महापालिका सभा ठराव क्र.१३१ दि.०५/०२/२०१८ व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचे बरोबर महापालिकेने केलेल्या दि.२८/२/२०१८ रोजीच्या सामंजस्य करारा नुसार महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचेकडील भूमिगत सेवावाहिन्या टाकणेसाठी त्याच संस्थेने मनपाने विहीत केलेल्या विनिदेशा प्रमाणे रस्ते दुरूस्त करून पुर्ववत करण्याच्या अटीस अधिन राहून व फक्त र.रू.१००/- प्रति मी. या प्रमाणे पर्यवेक्षण शुल्क आकारून रस्ता खोदाईस परवानगी देण्याबाबचे धोरण निश्चित झालेले आहे.

२) महाराष्ट्र शासनाकडील दि.१७/०५/२०१३ च्या पत्रानुसार दि.१/४/२००६ च्या शासन निर्णयानुसार ज्या नेटवर्किंग अभिकर्ता/संस्था (OFC केबल टाकणा-या) शासनाची रितसर परवानगी घेऊन महापालिकेकडे परवानगी मिळणेकामी मागणी करतील अशा अभिकर्ता/संस्थांचे प्रस्तावाबाबत शासन निर्णय दि.१/४/२००६ मध्ये नमुद प्रमाणे सूट देणेबाबत चा आदेश दि.३/७/२०१३ रोजी पारीत झालेला आहे. त्यानुसार सदर आदेशाच्या दिनांका पासून ज्या नेटवर्किंग कंपन्या शासनाची परवानगी घेऊन रस्ता खोदाईसाठी अर्ज करतील अशा नेटवर्किंग कंपन्यांकडून मनपा अधिभार न घेता फक्त रस्ता पुर्ववत करण्याचे शुल्क आकारून रस्ता खोदाईस परवानगी देण्यात येत आहे. (उदा. रिलायन्स जिओ इन्फोकॉम लि., वोडाफोन सेल्युलर लि., भारती एअरटेल इत्यादी नेटवर्किंग कंपन्या).

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी पत्र क्र.उ.अ./IFMNS/A56045/2018 दि.१२/२/२०१८ अन्वये “सदर रस्ते म औ वि महामंडळाचे मालकीचे असून रस्ते दुरूस्ती व देखभालीसाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस हस्तांरीत करण्यात आलेले आहेत. तरी मऔविम, क्षेत्रामधील जून्या जलवाहिन्या बदलण्यासाठी रस्ते खोदकाम शुल्क परिगणित करताना मनपा अधिभार लावू नये,” अशी विनंती केलेली आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने महापालिकेकडे औद्योगिक क्षेत्रातील रस्ते देखभाल व दुरूस्तीसाठी हस्तांतरीत केलेले आहे. सदर रस्त्यांची जागा मालकी ही महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांची असल्याने सदर ठिकाणी त्याच संस्थेच्या भूमिगत सेवावाहिन्या टाकणेसाठी मनपा अधिभार न घेता फक्त रस्ता दुरूस्ती शुल्क घेऊन तसेच, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना त्यांच्या जागा मालकी व्यतिरीक्त महापालिका कार्यक्षेत्रात भूमिगत सेवावहिन्या टाकणेसाठी मनपा अधिभार व रस्ता दुरूस्ती शुल्क आकारून सदर संस्थेस रस्ता खोदाईस परवानगी देणेबाबतचे धोरण निश्चित करणेसाठी मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने महापालिकेकडे औद्योगिक क्षेत्रातील रस्ते देखभाल व दुरूस्तीसाठी हस्तांतरीत केलेल्या जागेत त्याच संस्थेच्या भूमिगत सेवावाहिन्या टाकणेसाठी मनपा अधिभार न घेता फक्त रस्ता दुरूस्ती शुल्क आकारून, तसेच, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना त्यांच्या जागा मालकी व्यतिरीक्त महापालिका कार्यक्षेत्रात भूमिगत सेवावहिन्या टाकणेसाठी मनपा अधिभार व रस्ता दुरूस्ती शुल्क आकारून सदर संस्थेस रस्ता खोदाईसपरवानगी देणेबाबतचे धोरणात्मक निर्णयासाठी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१०) यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयामध्ये दरमहा एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात त्वचा व गुप्तरोग तज्ञ हे पद सहा महिने कालावधीकरीता भरणेकामी वर्तमानपत्रात व मनपा वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करून प्राप्त उमेदवराच्या मुलाखती घेणेत आल्या आहेत. त्यामध्ये पात्र डॉ. नचिकेत मधुकर पळसकर यांची उक्त आदेशाचे तारखेपासून सहा महिने कालावधीसाठी तात्पुरत्या/ हंगामी स्वरूपात र.रू.६०,०००/- प्र.महिना एकत्रित मानधनावर नेमणुक देणेत आली असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.११) यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयातील तात्पुरत्या/हंगामी स्वरूपात नेमलेल्या लॅब टेक्निशियन यांचे मानधनातील तफावत दुर/वाढ खाली नमुद केलेले तीन लॅब टेक्निशनय यांच्या मानधनात अनुभवानुसार खालील प्रमाणे दुरूस्ती/वाढ करून सुधारीत मानधन अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

| अ.क्र | मानधनात वाढ/दुरूस्ती करावयाचे लॅब टेक्निशियन यांची नावे | ९/०१/१४ चे नेमणुक आदेशात नमुद केलेला अनुभव | ९/१/१४ चे आदेशा नुसार दिलेले मानधन र.रू | जाहिरातीनुसार दि.०२/०१/१४ रोजी सादर केलेला अर्ज व अनुभव नुसार धरावयाचे अधिकृत ग्राह्य अनुभव | अधिकृत ग्राह्य अनुभवानुसार दि.०९/०१/१४ पासून ते दि.०८/०२/१५ अखेर द्यावयाचे मानधन र.रू | मा.आयुक्त सो यांचे दि.०९/०२/२०१५ चे आदेशानुसार अधिकृत ग्राह्य अनुभवानुसार दि.०९/०२/१५ पासून ते आज अखेर द्यावयाचे मानधन र.रू. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | श्रीम.मयुरी बाबु भालेराव | ४ वर्ष | १३०००/- | ५ वर्ष ८ महिने | १५०००/- | १७०००/- |
| २ | श्रीम.ज्योती किशोर कांबळे | ४ वर्ष | १३०००/- | ५ वर्ष ४ महिने | १५०००/- | १७०००/- |
| ३ | श्रीम.स्मिता शरद पिंपरे | ३ वर्ष | १००००/- | ५ वर्ष ३ महिने | १५०००/- | १७०००/- |

विषय क्र.१२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील घरोघरचा कचरा गोळा करणे व वाहतुक करणेचे कामांसाठी निविदेतील लघुत्तम ठेकेदार दीन महीला आधार रोज. संस्था यांना मोशी कचरा डेपोसाठी दर प्रति वाहन दोन खेपांसाठी र.रु.५१७०.९० व कचरा स्थानांतर केंद्र, नेहरुनगर येथे प्रति वाहन दोन खेपांसाठी र.रु.३९८७.४४ या दराने १ ट्रक वाहने दि.२५/१२/२०१७ अखेर उपलब्ध करून देणेकामी कामाचे आदेश देण्यात आले आहे. १ ट्रक वाहने याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मा. स्थायी समिती सभेने ठराव क्र.१७६५९ दि.०४/१०/२०१६ अन्वये मान्यता

दिलेली आहे. क्र.प्रशा/०२/कावि/४६०/२०१७, दि.०७/०८/२०१७ नुसार नविन क्षेत्रिय कार्यालयांची निर्मीती झालेली असुन नविन कार्यालयांच्या निर्मिती नुसार प्रभाग क्र.२ चिखली, मोशी या परिसराचा समावेश क क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात समाविष्ट करणेत आलेला आहे.सदरच्या भागातील कुदळवाडी, जाधववाडी या परीसरात मोठया प्रमाणात भंगार मालाची दुकाने तसेच मोठया प्रमाणात नागरीकरण झाल्याने घरोघरचा कचरा उचलणे व वाहतूक करणेची यंत्रणा अपुर्ण पडत असल्याने सन्मा. सदस्य व आरोग्य निरिक्षक, मुख्य आरोग्य निरिक्षक यांनी प्रभाग क्र.२ मध्ये २ वाढीव ट्रक वाहनाची मागणी केलेली आहे. क क्षेत्रीय कार्यालयाचे परिसरात मोठया प्रमाणात कुंटुंब संख्येत वाढ होत आहे. त्यामुळे मोठया सोसाटयांमधील कचरा गोळा करणेकामी वाढीव १ ट्रक लावून सध्या काही सोसाटयांमधील घरोघरचा कचरा गोळा करणेसाठी वापरता येतील. त्याचप्रमाणे परीसरातील गोळा करणेत आलेला कचरा उचलणेसाठी १ ट्रक असे एकुण २ ट्रक उपलब्ध करून देणे आवश्यक आहे म्हणुन दीन महीला आधार रोज. संस्था यांचेशी कचरा उचलणे व हलविणे या कामांसाठी दि.०५/१०/२०१६ रोजी प्रतिदिन १ ट्रक वाहने पुरविणेकामी करणेत आलेल्या करारनामा अट क्र.३४ नुसार मनपास कामासाठी जादा वाहनांची आवश्यकता असल्यास मा.सह आयुक्त यांच्या पुर्व परवानगीने मान्य दरामध्ये जादा टिपर वाहने उपलब्ध करुन घेण्याची अट आहे. त्यानुसार दीन महीला आधार रोज. संस्थायांचेकडून मोशी डेपोसाठी दर प्रति वाहन दोन खेपांसाठी र.रु.५१७०.९० व कचरा स्थानांतर केंद्र, नेहरुनगर साठी दर प्रति वाहन दोन खेपांसाठी र.रु.३९८७.४४ या दराने आणखी २ वाढीव ट्रक वाहने दि.०१/०३/२०१८ ते दि.३१/०८/१८ अखेर उपलब्ध करुन घेणेस व त्यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१३) “इ” क्षेत्रीय कार्यालया मार्फत श्री भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय, करीता कोटेशन नोटीस क्र.1 जा.क्र.भैसावा/कावि/0८/२०१८, दि.12/03/2018 अन्वये प्रसिध्द करून प्रस्तावा सोबतचे प्रपत्र “अ” नुसार दरपत्रक मागविले असता 3 पुरवठा धारकांकडुन कोटेशन प्राप्त झाले असून अक्षरविश्व बुक डिलर्स, गणेश पुरम अपार्टमेंट समोर, सासवड यांनी 25% सुट दिली आहे. श्री भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय, भोसरी या शासन अनुदान प्राप्त वाचनालयाकरिता 298 पैकी 158 पुस्तकांचा अक्षरविश्व बुक डिलर्स, गणेश पुरम अपार्टमेंट समोर, सासवड यांनी पुरवठा केला असुन इकडील आदेश क्र. श्रीभैसावा/05/कावि/18/2018 दि.26/03/2018 अन्वये र.रु.25,274/- अदा करण्यात आला आहे. तरी अक्षरविश्व बुक डिलर्स, गणेश पुरम अपार्टमेंट समोर, सासवड यांचेकडून प्राप्त झालेल्या लघुत्तम दराप्रमाणे श्री भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय, भोसरी करीता 158 पुस्तकांच्या छापिल किमतीवर 25% सुट देवून र.रू.25,274/- (अक्षरी र.रू.पंचवीस

हजार दोनशे चौ-याहत्तर फक्त) ची पुस्तके खरेदी केलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१४)पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र.ENV18/1-2017-18 अन्वये मैलाशुध्दीकरण केंद्र व पंपीग स्टेशन मध्ये आवश्यक क्षमतेचे व्हाईस्ट बसविणे व इतर अनुषंगीक कामे करणेकामी मे.प्लोमॅक इंजिनिअरिंग कार्पोरेशन यांचेकडुन नि.र.रु.११,९६,६६१/- (अक्षरी र.रू.अकरा लाख शहाण्णव हजार सहाशे एकसष्ठ फक्त) पेक्षा -१२.९०% कमी या सुधारित दराने प्राप्त झालेली आहे. निविदा स्विकृती योग्य दरापेक्षा -१८.६१% ने कमी येत असल्याने प्राप्त सुधारित दराने र.रु.१०,४२,२९२/- पर्यंत काम करुन घेणेकामी त्यांचेबरोबर करारनामा करून कामाचे आदेश देण्यात आले असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.१५) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मागविलेल्या ह प्रभाग आरोग्य नि.नो.क्र.1/2017-18 अन्वये ह क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील संपूर्ण परिसरात औष्णिक धुरीकरण कामकाज करण्यासाठी आवश्यक 4 डिझेल रिक्षा टेम्पो (वाहनचालकासह) भाडयाने घेणेबाबतनिविदा प्रसिध्द केले असता प्राप्त झालेल्या निविदांपैकी मे.श्री.संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार संस्था नि.र.रू.9,06,620/- (अक्षरी र.रू.नऊ लाख सहा हजार सहाशे वीस फक्त) -1.50% कमी दराने या ठेकेदारास करारनामा करुन कामाचा आदेश देण्यात आलेले असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.१६) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागा मार्फत विविध कल्याणकारी योजना राबविणेत येतात. या योजनांची वस्ती पातळीवर प्रभावीपणे अंमलबजावणी होणेसाठी, MSW अर्हताप्राप्त ११ समुह संघटकांची तात्पुरत्या स्वरूपात ६ महिने कालावधीसाठी मानधन तत्वावर नेमणूक करणेत आली आहे. त्यापैकी ५ समुहसंघटकांची तात्पुरत्या स्वरूपात केलेली नेमणूकीची मुदत दिनांक ९/४/२०१८ रोजी संपत असल्याने आदेशाचे तारखेपासुन अथवा प्रत्यक्ष रूजू तारखेपासून ६ महिने कालावधीसाठी प्रस्तावात नमूद केलेल्या ५ समुहसंघटकांना मुदत वाढ देणे व त्यांना प्रत्येकी र.रु.१५,०००/- + वाहतूक भत्ता र.रु.१,३००/- असे एकूण र.रु१६,३००/- मासिक एकवट मानधन देणे तसेच त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्र.१७)पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत अपंग कल्याणकारी योजने अंतर्गत अपंगांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. ‘झेप पुनर्वसन केंद्र’ चिंचवड हि मतिमंद व गतिमंद मुलांसाठी शिक्षण, प्रशिक्षण व विविध प्रकारच्या थेरपी

देणारी सामाजिक संस्था असुन या संस्थेने दिनांक २/२/२०१८ च्या पत्रान्वये कै. अंकुश बो-हाडे विद्यालय से.२४ प्राधिकरण निगडी हि इमारत वापरासाठी विनामुल्य मिळणेकामी मागणी केली आहे. तरी या संस्थेने मागणी केलेली जागा भुमि जिंदगी विभागाने प्रस्तावात नमुद मुद्ये करारनाम्यात नमुद करून झेप या संस्थेली ३ वर्षे कालावधीसाठी वापर करणेकामी विनामुल्य देण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/३/कावि/६७३/२०१८
दिनांक - ११/०५/२०१८

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.

(क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/२३७/२०१८ दि. ०२/०५/२०१८ विषय क्र.३ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, झोनिपु स्थापत्य विभाग
( विषयपत्र क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/२३७/२०१८ दिनांक ०२/०५/२०१८ लगत)
प्रपत्र अ ( अ.क्र. ०१ ते ६ )

| अ. क्र | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेची तारीख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेश दिनांक | निविदा रक्कम | स्विकृत दर | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | मे.व्यंकटेश्वरा कंन्स्ट्रक्शन | ०४/०४-१७-१८ | आनंदनगर व साईबाबानगर झोपडपट्टीत स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत सार्वजनिक शौचालयाची कामे करणे. | २८/०२/२०१८ | झोनिपु/स्था/नि/कावि/२२७/२०१८ | ०४/०४/२०१८ | २२४९१६१ | १७% कमी | १८,६६,८०४ |
| ०२ | मे.व्यंकटेश्वरा कंन्स्ट्रक्शन | ०४/१८-१७-१८ | आनंदनगर झोपडपट्टी येथे पेव्हिंग ब्लॉक बसविणे. | २८/०२/२०१८ | झोनिपु/स्था/नि/कावि/२३१/२०१८ | ०४/०४/२०१८ | २२४९७७२ | १७% कमी | १८,६७,३११ |
| ०३ | मे.व्यंकटेश्वरा कंन्स्ट्रक्शन | ३/२१-१७-१८ | हिराबाई लांडगे झोपडपट्टीमध्ये देखभाल व किरकोळ दुरुस्तीची कामे करणे व इतर अनूषांगिक कामे करणे. | १२/०३/२०१८ | झोनिपु/स्था/नि/कावि/२२८/२०१८ | ०४/०४/२०१८ | १८६५५५१ | १२% कमी | १६,४१,६८५ |
| ०४ | मे.श्रीगणेश कंन्स्ट्रक्शन | ०३/१२-१७-१८ | से.क्र.२२ ओटास्किम येथील इंदिरानगर व संजयनगर परिसरात पावसाचे पाणी वाहून जाणंकरीता स्ट्रॉम लाईन पाईप टाकणे. | १२/०३/२०१८ | झोनिपु/स्था/नि/कावि/२२९/२०१८ | ०४/०४/२०१८ | १८६६५०३ | ११% कमी | १६,६१,१८८ |

पान क्र.२......

प्रपत्र अ  पानांक क्र.०२

| अ. क्र | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेची तारीख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेश दिनांक | निविदा रक्कम | स्विकृत दर | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०५ | मे.श्रीगणेश कंन्स्ट्रक्शन | ३/११-१७-१८ | अंजठानगर झोपडपट्टीमध्ये किरकोळ दुरुस्तीची कामे व इतर अनुषांगिक कामे करणे. | १२/०३/२०१८ | झोनिपु/स्था/नि/कावि/२३०/२०१८ | ०४/०४/२०१८ | १३९६९०३ | ११% कमी | १२,४३,२४४ |
| ०६ | मे.श्रीयश कंन्स्ट्रक्शन | ३/२३-१७-१८ | से.क्र.२२ ओटास्किम मधील बौध्दनगर व मिलिंदनगर परिसरात पावसाळी पाणी वाहून जाणेकरीता स्ट्रॉम वॉटर लाईन टाकणे व इतर दुरुस्तीची कामे करणे. | २८/०२/२०१८ | झोनिपु/स्था/नि/कावि/२२६/२०१८ | ०४/०४/२०१८ | १८६४७४२ | १२% कमी | १६४०९७३ |

प्रपत्र क्र. अ  अ.क्र.०१ ते ०६

सक्षम प्राधिकारी तथा
सहा.आयुक्त,झोनिपु विभाग.
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८.